# जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय,अकोला.

दुरध्वनी क्र. 0724-2424442
email address -rdc_akola@redimail.com

फॅक्स 0724-2435007
web address :www.akolanic.in

**क्र.कक्ष-2/प्रस/गृह/कावि-213 /2020** **दिनांक: 13 / 04 /2020**

## आदेश

ज्याअर्थी, जिल्हयात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे निदर्शनास येत असून जिल्हयाती रुग्णांची संख्या वाढल्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अकोला येथील वैद्यकीय साधन सामुग्री कमी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्याअर्थी, उपरोक्त प्रमाणे स्थीती निर्माण झाल्यास जिल्हयातील तालुकास्तरावर "COVID-19 CARE CENTER" उभारणी करणे क्रमप्राप्त आहे. तथापि, "COVID-19 CARE CENTER" चे व्यवस्थापन योग्य रित्या होत आहे किंवा कसे ? याबाबत देखरेख ठेवण्यासाठी तहसीलदार यांचे अध्यक्षतेखाली समितीचे गठण करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, तालुकास्तरावर "COVID-19 CARE CENTER" उभारणी करतांना सदर केंद्रात आवश्यक असलेली वैद्यकीय सुविधा,स्वच्छता,पाणी,सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेली आवश्यक सामुग्री उपलब्ध आहे काय ? इत्यादीबाबत पाहणी करणे तसेच "COVID-19 CARE CENTER" उभारणी करीता आवश्यक साधनसामुग्री व व्यवस्थेबाबत आवश्यक ते सर्व कामे पार पाडण्यासाठी जिल्हयातील सर्व तालुक्यातील तहसीलदार यांचे अध्यक्षते खाली खालील प्रमाणे तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | गठीत समितीतील पद | शेरा. |
|---|---|---|---|
| 1 | तहसीलदार | अध्यक्ष | |
| 2 | गटविकास अधिकारी | सदस्य | |
| 3 | पोलीस निरिक्षक | सदस्य | |
| 4 | उपायुक्त,म.न.पा.(अकोला शहर) | सदस्य | |
| 5 | मुख्याधिकारी,नगरपरिषद/नगरपंचायत | सदस्य | |
| 6 | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य सचिव. | |

उपरोक्त नुसार तहसीलदार यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या तालुका स्तरीय समितीने "COVID-19 CARE CENTER" करिता आवश्यकत्या सर्व सोई सुविधा उपलब्ध करण्याबाबत तसेच "COVID-19 CARE CENTER" च्या व्यवस्थापन करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीवर सोपविण्यात येत आहे.

**"COVID-19 CARE CENTER" मध्ये उपरोक्त समितीने शासनाने दिलेल्या निर्देशा प्रमाणे आवश्यक त्या उपयायोजना करण्याबाबत समिती स्थरावरुन दक्षता घ्यावी. तसेच "COVID-19 CARE CENTER" मध्ये कोणतीही गैरसोय होणार नाही याची शासनाचे निर्देशान्वये आवश्यक ती खबरदारी घ्यावी.**

उपरोक्त प्रमाणे तालुक्यात कार्यरत असलेल्या रकाना क्रमांक 2 मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील "COVID-19 CARE CENTER" बाबतची सर्व कामे तातडीने पार पाडण्याबाबत आवश्यक ते निर्देश आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना देण्यात यावे.

तहसीलदरा तथा अध्यक्ष "COVID-19 CARE CENTER" यांनी सदर विषयाबाबत आवश्यक त्या वेळी सभा आयोजती करुन कोरोना विषाणु प्रादुर्भाव कसा रोखता येईल याबाबत आवश्यक ती सर्व उपाय योजना व दक्षता घ्यावी. केलेले कार्यवाही पर जिल्हा कार्यालयास व सर्व संबंधीतास वेळोवेळी अवगत करावे.

**उपरोक्त समितीचे गठण जिल्हयातून कोरोना विषाणु प्रादुर्भाव जो पर्यंत समाप्त होत नाही तो पावेतो अस्तीत्वात राहील.**

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
जिल्हादंडाधिकारी, अकोला.

प्रतिलिपी:

1. मा.विभागीय आयुक्त,अमरावती यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक यांना माहितीस्तव
3. अपर जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक यांना माहितीस्तव.
4. नि.उ.जि. यांचे स्वीय सहाय्यक यांना माहितीस्तव
5. उपविभागीय अधिकारी,अकोला/अकोट/बाळापूर/ मुर्तिजापूर यांना माहितीस्तव.
6. तहसीलदार,अकोला/अकोट/तेल्हारा/बाळापूर/पातूर/मुर्तिजापूर/बार्शिटाकळी.
7. गटविकास अधिकारी, अकोला/अकोट/तेल्हारा/बाळापूर/पातूर/मुर्तिजापूर/बार्शिटाकळी.
8. पोलीस निरिक्षक अकोला/अकोट/तेल्हारा/बाळापूर/पातूर/मुर्तिजापूर/बार्शिटाकळी.
9. मुख्याधिकारी,नगरपरिषद,अकोट/तेल्हारा/बाळापूर/पातूर/मुर्तिजापूर
10. मुख्याधिकारी,नगरपंचायत,बार्शिटाकळी
11. तालुका आरोग्य अधिकारी, अकोला/अकोट/तेल्हारा/बाळापूर/पातूर/मुर्तिजापूर/ बार्शिटाकळी.

यांना माहिती तथा उचित कार्यवाहिस्तव. आपण सदर गठीत समिती नुसार आपल्या विभागाशी संबंधीत कामे तातडीने पुर्ण करणे, गैरसोय होणार नाही याबाबत आवश्यक ती दक्षता घेणे इ. बाबत कामे करण्यासंदर्भाने आपल्या स्तरावरुन अवगत करावे. व केलेल्या कार्यवाही बाबत वेळो वेळी अवगत करावे.

12. ________________________________________
13. निवडनस्ती.

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
जिल्हादंडाधिकारी, अकोला.